**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्र. रानिआ/मनपा २०१२/प्र.क्र.५१/का.०५,
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ३१/०१/२०१३.

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व उपनगर वगळून)

विषय :- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका
जातवैधता प्रमाणपत्र अवैध/खोटे ठरल्याबाबत...

महोदय,

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांकरीता उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत जातीचे प्रमाणपत्र तसेच जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. काही उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत सादर केलेली जातवैधता प्रमाणपत्र अवैध/खोटी असल्याबाबत संबंधित विभागीय जातप्रमाणपत्र पडताळणी समितीने कळविले आहे. अशा प्रकरणांमध्ये त्या उमेदवारावर कोणती कार्यवाही करावी याबाबत राज्य निवडणूक आयोगाकडे काही महानगरपालिकांनी मार्गदर्शन मागीतले आहे.

यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने विधी विषयक सल्ला घेतला असून त्यानुसार, रिट याचिका क्रमांक ८३८९/२००५ मध्ये मा. मुंबई उच्च न्यायालय, यांच्या पूर्ण न्यायाधीश मंडळाने दिनांक २०.१०.२००६ रोजी खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविल्याचे कळविले आहे.

**Para 26** - "A candidate who sets up a claim as belonging to a particular caste by making an application to the Competent Authority and obtains the Caste Certifacate based on such claim and information and contests the election of the Councillor from the reserved seat and gets elected and if, ultimately, the Scrutiny committee upon inquiring into the correctness of such certificate declares such certificate invalid and cancels the same, it is obvious that such Caste Certificate has been obtained by that person on the basis of the declaration or information or claim which was not correct or true and upon invalidation and cancellation of the Caste Certificate by the Scrutiny Committee, such person incurs disqualification automatically. There is no escape from it. "

सदर निष्कर्षास अनुसरुन जातीचे प्रमाणपत्र अवैध / खोटे ठरलेल्या प्रकरणांमध्ये अर्नहतेचे ओपचारीक आदेश काढण्याची कार्यवाही महानगरपालिकांच्या बाबतीत संबंधित महानगरपालिका आयुक्त, जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या बाबतीत संबंधित विभागीय आयुक्त तसेच नगर परिषद/नगरपंचायती व ग्रामपंयाचतींच्या बाबतीत संबंधित जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या स्तरावरुन

विनाविलंब करावी. मात्र असे करताना जात पडताळणी समितीच्या निर्णयाला कोणत्याही न्यायालयाने स्थगिती दिलेली नाही अथवा समितीचा निर्णय फिरविलेला/रद्द केलेला नाही याची खातरजमा करुन घेण्यात यावी.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार.

आपला,

( वि.मा.पानसरे )
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र